आजचा शुभ विचार

जे इतिहास विसरतात, ते इतिहास घडवू शकत नाहीत.'इतिहास कधी विसारायचा नसतो. त्यातून अनेक गोष्टी शिकायच्या असतात. ज्या चुका इतिहासात झाल्या त्या पुन्हा होऊ द्यायच्या नसतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-11 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 10 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ११ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. १० मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## पाकिस्तानकडून सीमेवरील ३६ ठिकाणी सुमारे ३०० ते ४०० ड्रोन्सनी हल्ला; परराष्ट्र मंत्रालयाने दिली माहिती

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर प्रत्युत्तर म्हणून भारताने ७ मे रोजी मध्यरात्री पाकिस्तानच्या दहशतवादी तळावंर हल्ले केले. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले होते. दरम्यान यानंतर भारत आणि पाकिस्तानाने एकमेकांवर हल्ले केले आहेत. काल देखील पाकिस्तानकडून भारताच्या हवाई हद्दीत ड्रोन सोडण्यात आले होते. ज्याला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिलं. आज परराष्ट्र मंत्रालयाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी विंग कमांडर व्योमिका सिंग, कर्नल सौफिया कुरेशी यांनी पाकिस्तानी ड्रोन्स आणि त्यांना देण्यात आलेलं प्रत्युत्तर याबद्दल सविस्त माहिती देण्यात आली. या पत्रकार परिषदेत कर्नल सौफिया कुरेशी यांनी सांगितलं की, "८ ते ९ मे २०२५च्या मध्यरात्री पाकिस्तानी लष्कराने लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याच्या हेतूने संपूर्ण पश्चिमी लष्करावरील भारतीय हवाई सीमेचे वारंवार उल्लंघन केले. इतकेच नाही तर पाकिस्तानी लष्कराने नियंत्रण रेषेवर मोठ्या कॅलिबरच्या हत्यारांनी गोळीबार देखील केला. आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवर लेहपासून ते सर क्रीक (Sir Creek) पर्यंत ३६ ठिकाणी सुमारे ३०० ते ४०० ड्रोन्सचा वापर घुसखोरीसाठी केला. भारतीय सुरक्षा दलांनी कायनेटिक किंवा नॉन कायनेटीक साधनांच्या मदतीने यापैकी काही ड्रोन्स पाडले." कर्नल सौफिया कुरेशी पुढे बोलताना म्हणाल्या की, " इतक्या मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेल्या हवाई घुसखोरीचा संभावित उद्देश वायु रक्षा प्रणालींचे परिक्षण करणे आणि गुप्त माहिती गोळा करणे हे होता. ड्रोन्सच्या अवशेषांची फॉरेन्सिक तपासणी केली जात आहे. प्राथमिक अहवालानुसार, ते तुर्कीचे Assisguard Songar ड्रोन होते. याशिवाय रात्री पाकिस्तानच्या एका सशस्त्र युएव्हीने भटिंडा लष्करी तळाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, ज्याला पकडून निष्क्रिय करण्यात आले. पाकिस्तानी हल्ल्याच्या बदल्यात पाकिस्तानात चार हवाई सुरक्षा तळांवर सशस्त्र ड्रोन्सनी लाँच करण्यात आले. यापैकी एका ड्रोनने एडी रडारला यशस्वीरित्या नष्ट केले." " पाकिस्तानने जम्मू आणि काश्मीरच्या तंगधार, उरी, पूंछ, मेंढर, राजौरी, अकनूर आणि उधमपूर येथे मोठ्या कॅलिबरच्या आर्टिलरी गन आणि सशस्त्र ड्रोन्सचा वापर करत नियंत्रण रेषेवर गोळीबार देखील केला. ज्यामुळे भारतीय सेनेचे काही जवान शहीद आणि जखमी झाले. प्रत्युत्तरादाखल केलेल्या भारताच्या कारवाईत पाकिस्तानी लष्कराचे देखील मोठे नुकसान करण्यात आले," असेही कर्नल कुरेशी यांनी यावेळी सांगितले.

## पाकिस्तानच्या गोळीबारात काही भारतीय जवान शहीद; वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी प्रसार माध्यमांना दिली माहिती

विशेष वृत्तसेवा
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



ऑपेरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानी सैन्याने काल रात्री भारतातील काही ठिकाणांवर ३०० ते ४०० ड्रोनच्या माध्यमातून अयशस्वी हल्ले केले होते. यामध्ये भारताने पाकिस्तानचे हे सर्व हल्ले परतावून लावले आहेत. मात्र, पाकिस्तानी सैन्याकडून करण्यात आलेल्या गोळीबारात काही भारतीय जवान शहीद झाले आहे. याबाबत सरकारने आज पत्रकार परिषदेत माहिती दिली. विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, " पाकिस्तानी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानमधील चार हवाई संरक्षण स्थळांवर सशस्त्र ड्रोन डागण्यात आले होते. त्यापैकी एक ड्रोन एडी रडार नष्ट करण्यात यशस्वी झाला. पाकिस्तानने हेवी-कॅलिबर तोफखाना आणि सशस्त्र ड्रोन वापरून नियंत्रण रेषेवर तोफगोळ्यांचा मारा केला. याचबरोबर भारताने दिलेल्या प्रत्युत्तरात पाकिस्तानी सैन्याचेही मोठे नुकसान झाले आहे. तसेच या कारवाईत भारतीय लष्कराचे काही जवान शहीद झाले आहेत. तर, काही जवान जखमी झाले आहेत." या पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले, "पाकिस्तानने आपले कृत्य मान्य करण्याऐवजी, भारतीय सशस्त्र दल अमृतसरसारख्या त्यांच्याच शहरांना लक्ष्य करत आहेत आणि पाकिस्तानवर दोषारोप ढकलण्याचा प्रयत्न करत आहे असे हास्यास्पद आणि अपमानजनक दावे केले आहेत. भारताने नानकाना साहिब गुरुद्वारावर ड्रोन हल्ला केला अशी चुकीची माहिती पाकिस्तानने पसरवली आहे, जी खोटी आहे. जातीय वाद निर्माण करण्याच्या उद्देशाने पाकिस्तान परिस्थितीला सांप्रदायिक रंग देण्याचा प्रयत्न करत आहे." ते पुढे म्हणाले की, "काल रात्री पाकिस्तानने केलेल्या या चिथावणीखोर आणि आक्रमक कृतींमध्ये भारतीय शहरे आणि नागरी पायाभूत सुविधा तसेच लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य करण्यात आले. याला भारतीय सशस्त्र दलांनी अतिशय संतुलित प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानने या हल्ल्यांची जबाबदारी नाकारणे हे त्यांच्या ढोंगीपणाचे उदाहरण आहे." याच पत्रकार परिषदेत बोलताना, कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या, " ८-९ मे च्या मध्यंतरी रात्री, पाकिस्तानी सैन्याने लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याच्या उद्देशाने संपूर्ण पश्चिम सीमेवर अनेक वेळा भारतीय हवाई हद्दीचे उल्लंघन केले. पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवरही मोठ्या कॅलिबर शस्त्रांचा गोळीबार केला. आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवरील ३६ ठिकाणी घुसखोरीसाठी ३००-४०० ड्रोनचा वापर करण्यात आला. भारताने यापैकी अनेक ड्रोन पाडले. दुसरीकडे, पाकिस्तानने नागरी विमानांचा वापर ढाल म्हणून केला."




## साश्रुनयनांनी शहीद सचिन वनंजे यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------





भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले जवान सचिन यादवराव वनंजे यांचा देशसेवेच्या कर्तव्यावर असताना श्रीनगरच्या परिसरात ६ मे रोजी अपघाती मृत्यू झाला होता. आज ९ मे रोजी देगलूर येथे अत्यंत शोकाकूल वातावरणात साश्रुनयनांनी त्यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधी, अधिकारी व मोठ्या नागरिक उपस्थित होते.

सचिन यांच्या निधनाची माहिती भारतीय सैन्यदलामार्फत त्यांच्या कुटुंबियांना मिळताच तालुक्यातील तमलूरसह देगलूरवर शोककळा पसरली. शहीद सचिन यांचे पार्थिव आज देगलूर येथील त्यांच्या राहत्या घरी पहाटे ४ वाजता दाखल होताच परिवारातील सदस्यांसह उपस्थितीतांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. सकाळी ठिक ८.३० वाजता फुलांनी सजवलेल्या लष्कराच्या वाहनातून शहिद सचिन वनंजेच्या घरापासून अंत्ययात्रेला प्रारंभ झाला. शहरातील मुख्य मार्गाने नगरपालिका शेजारी असलेल्या मैदानात अंत्यविधीसाठी त्यांचे पार्थिव आणण्यात आले. यावेळी " शहिद सचिन वनंजे, अमर रहे अमर रहे" च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी खासदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार जितेश अंतापूरकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत गोसावी, तहसीलदार भरत सुर्यवंशी, गटविकास शेखर देशमुख, मुख्याधिकारी निलम कांबळे आदींसह आजी व माजी सैनिक आणि मोठया संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली व यावेळी मुख्यमंत्र्यांचा शोकसंदेश वाचुन दाखवण्यात आला. देगलूर नगरपालिका शेजारी तयार केलेले अंत्यविधीस्थळी भारतीय सैन्यदलाच्या पथकाने मानवंदना दिली. त्यानंतर शहीद सचिन वनंजेच्या पार्थिवावर अग्निसंस्कार करण्यात आले. सचिन वनंजे सन २०१७ मध्ये भारतीय सैन्य दलात दाखल झाला होते. त्यांची पहिली पोस्टिंग सियाचीन भागात झाली. त्यानंतर जालंधर पंजाब येथे त्यांनी सेवा केली. गेल्या दीड वर्षापासून ते श्रीनगरमध्ये कर्तव्यावर होते. दरम्यान दि.६ मे रोजी वाहन दरीत कोसळून त्याचा मृत्यू झाला होता.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या

दैनिक स्वराज्यदूत

या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी

आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# दहशतवादाचा दमनदिन!

शत्रूंच्या कोंडाळ्यात शांततेत राहायचे, तर युद्धासाठी सिद्ध असले पाहिजे या तत्त्वाची प्रचीती यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने आणून दिली...

'ऑपरेशन सिंदूर' असे अर्थगर्भित नामकरण झालेली मर्यादित लष्करी मोहीम भारतीय सैन्यदलांनी ६ मेच्या मध्यरात्रीनंतर सुरू केली आणि अवघ्या २५ मिनिटांमध्ये सुफळ संपूर्ण केली. दुसऱ्या दिवशी देशभर उत्तर आणि पश्चिम भागांमध्ये युद्धप्रतिकारात्मक सराव प्रात्यक्षिके नियोजित होती. ती झाल्यानंतर, पुरेशा तयारीनिशी भारत प्रतिहल्ला करेल अशी पाकिस्तानची अटकळ होती. पण या प्रात्यक्षिकांच्या आदल्याच मध्यरात्री हल्ले करून भारताने शत्रूला गाफील गाठले. तत्परता हा कोणत्याही युद्धकारवाईच्या यशस्वितेचा पहिला टप्पा असतो. त्यात भारत १०० टक्के यशस्वी झाला. यंदाच्या हल्ल्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, १९७१ नंतर प्रथमच भारताने पाकिस्तानातील पंजाब प्रांतात हल्ले केले. हे धाडस विशेषच. पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारताने यापूर्वीही हल्ले केलेले आहेत. 'सर्जिकल स्ट्राइक' हे त्यांपैकी एक उदाहरण. याही वेळी पाकव्याप्त काश्मीरमध्ये मुझफ्फराबाद, कोटली अशा ठिकाणांवर आपण प्रहार केले. पण नऊपैकी पाच ठिकाणे ही पंजाबमधील आहेत. बहावलपूर, सियालकोट, मुरीदके या ठिकाणी दहशतवाद्यांचे तळ किंवा जैश, लष्कर- ए- तय्यबासारख्या संघटनांची मुख्यालये यांना लक्ष्य करण्यात आले. पाकव्याप्त काश्मीरला भारताचा सार्वभौम भूभाग आपण मानतो. पण पाकिस्तानमधील पंजाब हा त्या देशाचा वादातीत सार्वभौम भूभाग आहे. पाकिस्तानी लष्करात आणि राजकारणात त्या पंजाब प्रांताचे नि:संशय आणि अनिर्बंध प्रभुत्व आहे. तेथील भूमीवर हल्ला करून भारताने पाकिस्तानी लष्कर आणि पाकिस्तानी राज्यकर्त्यांना इशारा दिला हे महत्त्वाचे. पाकिस्तानचे विद्यमान पंतप्रधान शाहबाझ शरीफ आणि विद्यमान लष्करप्रमुख असिम मुनीर हे पंजाबचेच. याच पंजाबमध्ये लष्कर- ए- तय्यबा, जैश- ए- मोहम्मद या दहशतवादी संघटनांची मुख्यालये आहेत. तेथे हाफीझ सईद, मसूद अझर हे दहशतवादी म्होरके आजही उजळ माथ्याने फिरत आहेत. भारतीय क्षेपणास्त्रे पंजाबपर्यंत पोहोचू शकतात म्हणजे ती या मंडळींपर्यंतही पोहोचू शकतात हा संदेश 'ऑपरेशन सिंदूर' मधून भारताने दिलेला आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार ही कारवाई नेमकी, मर्यादित आणि युद्धभडका टाळणारी होती. या कारवाईचे उद्दिष्ट केवळ दहशतवाद्यांचा नि:पात आणि पाकिस्तानास जरब बसवणे इतके मर्यादित होते. पण तिची व्याप्ती ही उरीनंतर झालेले सर्जिकल स्ट्राइक आणि पुलवामापश्चात बालाकोटमध्ये झालेले हवाई हल्ले यांच्यापेक्षा अधिक होती. भारताने या वेळी नऊ ठिकाणी हल्ले केले. ते करताना कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानच्या लष्करी आस्थापना किंवा नागरी वस्त्यांना झळ पोहोचणार नाही याची दक्षता घेतली. असे केल्यामुळे पाकिस्तानची पंचाईत झाली हे नक्की. भारतात दहशतवादी पाठवण्यासाठी डझनभर तळ सीमावर्ती भागांतच नव्हे, तर पाकिस्तानच्या अंतर्गत भागामध्येही उभारले गेले हे यातून उघड झालेच. आता भारताने हल्ले केले हे स्वीकारायचे, तरी नामुष्की आणि दहशतवाद्यांवर मालकी सांगून भारताचा निषेध करणे हीदेखील नामुष्कीच. ही चरफड त्या देशाच्या नेतृत्वाकडून प्रसृत झालेल्या प्रतिक्रियांमध्ये उमटलेली दिसते. अगदी सुरुवातीला पाकिस्तानकडून 'भारताची काही लढाऊ विमाने पाडली' या स्वरूपाची दिशाभूल करणारी वक्तव्ये पेरली गेली. त्यानंतर 'भारताला क्षणैक आनंद साजरा करू दे. पण दीर्घकालीन दु:ख त्यांस भोगायला लावू' अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या.

पण या वल्गनावजा प्रतिक्रियांपेक्षा वेगळे आणि अधिक हा देश काय करू शकतो? दहशतवादास, धर्मांधवादास कवटाळल्यामुळे त्या देशाच्या वाटेला यापेक्षा वेगळे भोग येणार नव्हतेच. दहशतवादविरोधी जागतिक लढ्यामध्ये ९/११ च्या हल्ल्यानंतर पाकिस्तानला सहकारी म्हणून बरोबर घेण्याचे हास्यास्पद धोरण तत्कालीन अमेरिकी अध्यक्ष धाकटे जॉर्ज बुश यांनी अंगीकारले, त्याच वेळी भारताचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांनी इशारा दिला होता, 'अफगाणिस्तान नव्हे, पाकिस्तान हाच जागतिक दहशतवादाचा केंद्रबिंदू आहे'! ही घटना २००१ मधील. त्यानंतर दहाच वर्षांनी दहशतवादनाट्यातील मुख्य खलनायक ओसामा बिन लादेन भर पाकिस्तानात, त्यांची राजधानी इस्लामाबादपासून जवळ असलेल्या अबोटाबाद येथे मारला गेला. तेथेच पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांना घडवणारी लष्करी अकादमी आहे. पंजाबी वर्चस्ववादाला भारतविरोधाची, धर्मांधतेची जोड देऊन तेथील लष्करी नेतृत्वाने जनरल झिया उल हक यांच्या राजवटीत जिहादी मानसिकतेला कवटाळले. त्यांचाच अवतार आणि तितक्याच कडव्या जिहादी मानसिकतेचे जनरल असिम मुनीर आज पाकिस्तानचे लष्करप्रमुख आहेत हा योगायोग नाही. या लष्करप्रमुख मंडळींची काही वैशिष्ट्ये ठरलेली. ते जिहादी आहेत पण धर्माचरण करतात असेही नाही. यांतील कित्येकांना धार्मिक बंधने मान्य नाहीत, ते बेछूट जीवन जगायचे नि जगतात. त्यांतील बहुतेक जण पदावर असताना गडगंज माया जमवतात आणि निवृत्त झाल्यानंतर परदेशी निघून जातात. मागे राहिलेले लष्करशहा मग तितक्याच निगुतीने पाकिस्तानातील संसाधने ओरबाडत राहतात. यांना भारताविषयी तिटकारा असतो, कारण लोकशाही नकोशी असते! भारतीय लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेचा 'नकोसा' प्रभाव पाकिस्तानी जनतेवर पडला, तर आपली दुकाने बंद होतील ही त्यांची रास्त भीती. त्यासाठी युद्धज्वर चेतवत ठेवायचा, भारतविरोधी दहशतवाद पोसत राहायचा, काश्मीर ते क्रिकेट अशा वेगवेगळ्या परिघांमध्ये भारत हाच शत्रू जनमानसात राहील यासाठी पोषक वातावरणनिर्मिती करायची हेच यांच्या जगण्याचे आणि प्रगतीचे ईप्सित. भारताने (बांगलादेशाची निर्मिती करून) आम्हाला तोडले, आता या देशाचा हजार जखमांनी रुधिरक्षय करून त्यांना तडफडवून मारू अशा वल्गना येथील लष्करी अकादम्यांतील तरुण अधिकारी पांढरकेसे जनरल होईपर्यंत करत राहतात. पाकिस्तानी राज्यकर्त्यांना एखाद्या वेळेस लोकशाहीचे उमाळे आलेच, तर त्यांना चिरडणे किंवा सत्ताच्युत करणे हा पाकिस्तानी लष्करशहांचा जोडधंदा. या धर्मकेंद्री आंधळ्या राष्ट्रवादाने आज पाकिस्तानची दैना झाली आहे. जगात पत नाही नि देशात दाणा नाही अशी स्थिती. या स्थितीकडून इतरत्र लक्ष वळवण्यासाठी भारतात घुसखोरी करून हल्ले घडवून आणणे हाच एक मार्ग. कारण भारताशी दुश्मनी संपवली, तर करार करावे लागतील. व्यापारी संबंध वाढवावे लागतील. पाकिस्तानातील तरुण भारतीय विद्यापीठांमध्ये शिकू मागतील. भारतीय माल पाकिस्तानी बाजारपेठांमध्ये येऊ लागेल. 'त्यांच्या' काश्मीरप्रमाणेच 'आमच्या' काश्मीरमध्ये निवडणुका घ्याव्या लागतील. सगळ्या पातळ्यांवर, आघाड्यांवर बरोबरी आहेच कुठे? म्हणून मग जिहादींना पैसा, शस्त्रे, प्रशिक्षण पुरवणे किंवा अण्वस्त्रांच्या डरकाळ्या फोडणे याच मार्गांनी भारताला जरब बसवण्याचा प्रयत्न पाकिस्तानकडून होत असतो. भारताची राजनैतिक संस्कृती प्रत्युत्तरातूनही संयम दाखवणारी आहे हेही पाकिस्तानी लष्करशहांना पक्के ठाऊक असते. यातूनच मग अनेकदा १९७१ मधील मानहानीचे विस्मरण होते नि फजिती होते. ही फजिती ढाक्यात दिसली, लोंगिवालामध्ये दिसली, कारगिलमध्ये दिसली नि हाजी पीरमध्येही दिसली. तरी बोध होत नाही, कारण तो करून घ्यायची संस्कृती नाही. पाकिस्तानी लष्करशहा हे त्या देशाचे सर्वांत मोठे शत्रू आहेत. जोपर्यंत त्या देशावर लष्करशहांची पकड मौजूद आहे, तोवर त्या देशातील जनतेला स्थैर्य, शांतता, समृद्धी या मूल्यांची फळे चाखायला मिळणार नाहीत. 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने त्या देशाला नऊ वर्षांत तिसऱ्यांदा कुरापतखोरीपासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. शत्रूंच्या कोंडाळ्यात शांततेत राहायचे, तर युद्धासाठी सिद्ध असले पाहिजे या तत्त्वाची प्रचीती यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने आणून दिली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. दहशतवादाचे दमन करण्याची ही शेवटची वेळ नसली, तरी प्रतिहल्ल्याची अचूकता आणि व्याप्ती पाहता येथून पुढे स्वत:चे किती नुकसान करून घ्यायचे हे पाकिस्ताननेच ठरवायचे आहे!

# चुटकीभर सिंदूर की कीमत : ऑपरेशन सिंदूर

जम्मूकश्मीरमधील पहलगाम येथील निरपराध हिंदू यात्रेकरूंची दहशतवाद्यांनी केलेली अमानुष हत्या निंदनीय आणि दोषार्ह होती आणि आहे. भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर योजनेनुसार दहशतवाद्यांचे तळ धराशायी केले. काही दहशतवादीही ठार केले. ज्या भारतीय महिलांचे कुंकू या दहशतवाद्यांनी पुसून टाकले त्या कुंकवाला किंवा सिंदूराला आपल्या हिंदू संस्कृतीत विशेष पावित्र्य आहे. चुटकीभर सिंदुराचे मोल या पाकपुरस्कृत दहशतवादी पाकड्यांना असे कळावे? भारतीय संस्कृती प्रतीकांतून प्रकट होते. ऑपरेशन सिंदूर मोहिम ही त्याचाच भाग आहे. यात मोठा अर्थ, आमच्या राष्ट्राची अस्मिता दडलेली आहे. ही मोहीम अजून संपलेली नाही, असे आपले संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे. हे ध्यानात घेतले पाहिजे.

या हल्ल्यात पुढाकार घेतलेल्या भारतीय महिला लष्करी अधिकारी कर्नल सोफ़िया कुरैशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांचे विशेष अभिनंदन केले पाहिजे. या भारतीय महिला लष्करी अधिकाऱ्यांनी आपल्या भारतीय सैन्यासह चुटकीभर सिंदुराची किंमत काय असते, हे नापाक पाकड्यांना दाखवून दिले.

**तूफ़ान में कश्ती खेते हैं,**
**कुहसार से टक्कर लेते हैं।**
**हम जंग में सर दे देते हैं,**
**हम पांव हटाना क्या जानें।।**

शमीम करहानी म्हणतात, वादळ असले तरी समुद्रात नाव हाकारतो. महाकाय पर्वतांना धडका देतो. वेळ आली तर रणांगणात शीरही अर्पण करतो. पण पाय मागे घेणे किंवा माघार घेणे आम्हाला ठाऊक नाही.

जातधर्मविरहित देशहिताला प्राधान्य देणाऱ्या कर्नल सोफ़िया कुरैशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या वीरांगना अधिकाऱ्यांना शत शत सलाम!

लेखक
नाना ढवळे
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्या नगर.




शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# "प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रील, वॉर रुम आणि..";

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरक्षेचा आढावा घेतल्यानंतरचे निर्देश

**विशेष वृत्त सेवा**
**दैनिक स्वराज्यदूत**

----------------------------



भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.

**यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे...**

·प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा.

·ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.

·ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा.

·केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.

·प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

·प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो 1 तासात मंजूर करा.

·एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.

·पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.

·सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.

·सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या

·नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.

·शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या

·सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

# सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात इनव्हीजन २०२५ संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------












शिस्तबद्ध मेहनत केली तर व्यक्तिमत्त्व जडणघडणीत जादुई बदल होऊ शकतात, तसेच जिद्द असेल तर कोणतीही भाषा अडसर ठरत नाही, असे प्रतिपादन करिअर कौन्सिलर आशिष दीक्षित यांनी केले. सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर येथे आयोजित केलेल्या इनव्हीजन २०२५ या करिअर मार्गदर्शन मेळाव्यानिमित आशिष दीक्षित यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. योग्य करिअर निवडले तर यश मिळविणे तितकेच सोपे जाते असे भारतभरातल्या असंख्य व्यक्तिमत्वांची उदाहरणे त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन करण्यात आले. मेळाव्यास उपस्थित असलेल्या विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील असंख्य करिअर विषयक प्रश्नांची उत्तरे तज्ञ शिक्षकांनी दिली.

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मार्गदर्शक भूपेश घरत यांनी महाविद्यालयाचे कौतुक करत, विद्यार्थ्यांनी चाकोरीबद्ध विचार करू नये, एखादी गोष्ट केवळ मनात आणून चालत नाही ती प्रत्यक्षात उतरविण्या करिता परिश्रम करावे लागतात, असे विचार मांडले. करिअरमधील संभ्रम दूर करण्याकरता मार्गदर्शक मेळाव्याची आवश्यकता असते असे प्रतिपादन आपल्या प्रास्ताविकातून प्राचार्य डॉ. किरण सावे यांनी केले. सोयीसुविधा, सुरक्षितता आणि उत्तम दर्जाचे शिक्षण मिळणारे महाविद्यालय हे उत्तम असते. आम्ही हे सर्व निकष पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोपात सीए सचिन कोरे यांनी केले. तसेच सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळीचे भावी काळातील शैक्षणिक प्रकल्पांची माहिती उपस्थितांना दिली.

कोषाध्यक्ष मंगेश पंडित, सचिव सुधीर कुलकर्णी, अनिल पाटील, कनिष्ठ महाविद्यालय शालेय समिती कार्याध्यक्ष प्रकाश संखे, सदस्य सुरेश जोशी, अरविंद कंसारा, भरत राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी सहायक प्राध्यापिका ओमकारी पोतदार आणि युथ फेस्टिवल मध्ये यश संपादन करणारा सोहम घरत यांनी प्राप्त केलेल्या यशाचे वर्णन केले. महाविद्यालयाच्या सहकार्यांचे आभार मानले. इनव्हीजन २०२५ यशस्वी करण्यात उपप्राचार्य तानाजी पोळ आणि उपप्राचार्य व उपक्रमाचे समन्वयक महेश देशमुख यांनी विशेष मेहनत घेतली. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. दर्शना चौधरी यांनी केले.

> मी ग्रामीण पार्श्वभूमी असलेला विद्यार्थी परंतु राष्ट्रीय स्तरावरच्या सांस्कृतिक स्पर्धांमध्ये आणि विविध मालिकांमध्ये सहभागी होण्याची संधी महाविद्यालयातील सांस्कृतिक मंडळाच्या प्रयत्न आणि प्रोत्साहनामुळे मला प्राप्त झाली.
> **सोहम घरत**

> संशोधन स्पर्धेतील मला प्राप्त झालेल्या यशामागे सोनोपंत दांडेकर महाविद्यालयातील मार्गदर्शकांचे योगदान आहे. महाविद्यालयाने मला नेहमीच आर्थिक पाठबळ आणि पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. माझे महाविद्यालय माझे उर्जास्त्रोत आहे.
> **प्रा. ओमकारी पोतदार**

## ११ मे मातृदिन विशेष

# मुल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते !

प्रविण बागडे
नागपूर



मातृदिन हा आईचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. दरवर्षी संयुक्त राज्य आणि इतर काही देशांमध्ये मे च्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. १९१२ मध्ये 'मदर्स डे' चे संस्थापक अण्णा जार्विस यांनी 'मे मध्ये दुसरा रविवार' आणि 'मदर्स डे' या म्हणीचा ट्रेडमार्क केला आणि मदर्स डे इंटरनॅशनल असोसिएशनची स्थापना करुन माता आणि मातृत्वाच्या सन्मानार्थ मातृदिन साजरा करण्याची कल्पना सुचविली होती. १९१४ मध्ये तिला राष्ट्रीय मान्यता मिळविण्यात यश आले. तेव्हापासुन या दिवशी लोक आईचा आदर म्हणुन तिला सप्रेम भेट म्हणून एखादी प्रिय वस्तू आणि शुभेच्छा देवून 'मदर्स डे' साजरा करतात. तसेच हा कुटुंबातील किंवा व्यक्तीच्या आईचा तसेच मातृत्व, मातृबंध आणि समाजातील मातांचा प्रभाव यांचा सन्मान करणारा उत्सव आहे. हा जगातील बराच भागांमध्ये विविध दिवसांमध्ये साजरा केला जातो, सामान्यतः मार्च किंवा मे महिन्यांत हा साजरा केला जातो. काही देशात जसे बल्गेरिया आणि रोमानिया येथे जागतिक महिला दिन हा दिवस 'मदर्स डे' म्हणून साजरा केला जातो.

भारतीय संस्कृतीत आधुनिक 'मदर्स डे' आत्मसात करण्यात आला आहे आणि दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. भारतीय लोक हा प्रसंग धार्मिक कार्यक्रम म्हणून साजरा करत नाहीत; त्याचा उत्सव मुख्यतः शहरी भागांपुरता मर्यादित आहे जेथे या प्रसंगाचे मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण केले गेले आहे. या दिवशी मुले आई आणि आजी यांना भेटवस्तू देतात. हे अशाच प्रकारच्या उत्सवांना पूरक आहे, मुख्यत्वे व्यावसायिक हितसंबंधांमुळे, कुटुंबातील सदस्यांचा सन्मान करणे, जसे की फादर्स डे, सिबलिंग डे आणि आजी-आजोबांचा दिवस. हजारो वर्षांपासून जगभरात अस्तित्वात असलेल्या माता आणि मातृत्वाच्या अनेक पारंपारिक उत्सवांशी त्याचा थेट संबंध नाही, जसे की ग्रीक पंथ ते सायबेले, मातृदेवता रिया, हिलारियाचा रोमन सण किंवा इतर ख्रिश्चन धर्मगुरू मदरिंग रविवारचा उत्सव मदर चर्चच्या प्रतिमेशी संबंधित आहे. तथापि, काही देशांमध्ये 'मातृदिन' अजूनही या जुन्या परंपरांचा समानार्थी आहे.

आई म्हणजे ममता, तसेच आई म्हणजे आत्मा आणि आई म्हणजे ईश्वर या दोघांचा संगम म्हणजे 'आई' होय. मायेची पाखरण करणारी एक स्त्री. एखादी स्त्री जेव्हा आपल्या अपत्यास जन्म देते त्यावेळेस तिला मातृत्व प्राप्त होते आणि तेव्हाच समाजाच्या दृष्टीने ती त्या अपत्याची आई बनते. आईचे खरे प्रेम आणि पालनपोषण या सोबत कशाचीही तुलना केली जाऊ शकत नाही. आमच्या आयुष्यातील ती एकमेव महिला आहे जी कोणत्याही हेतूशिवाय आपल्या मुलांवर भरपूर प्रेम करते. मूल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते. ती एक चांगली श्रोता आहे आणि आम्ही सांगत असलेल्या आमच्या चांगल्या आणि वाईट गोष्टी ऐकत असते. ती आम्हाला कधीही रोखत नाही आणि कोणत्याही प्रकारे आम्हाला बांधत नाही. ती आम्हाला चांगल्या आणि वाईट मधील फरक शिकवते. आई आम्हाला प्रत्येक आनंदात आणि दुःखात मदत करते, जेव्हा आपण आजारी असतो, तेव्हा ती आपल्यासाठी रात्रभर जागी राहुन आपल्या चांगल्या आरोग्यासाठी देवाची प्रार्थना करते. शब्द मानवी भावनांशी निगडित असून त्यास माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. स्त्रीने जन्म दिला नसतानाही ती सवतीच्या मुलाची किंवा दत्तक मुलाची आई बनते. आई ही शांतादुर्गाचे रूप आहे, मराठी भाषेतला 'आई' हा आई मायेचा सागर आहे. मराठीतील प्रसिद्ध कवी यशवंत यांनी आपल्या कवितेत 'स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी' ही ओळ लिहून 'आई' या शब्दाची महानताच थोडक्यात सांगीतले. आजच्या दिनी सर्वांना 'मदर्स डे' च्या शुभेच्छा!

घर सुटतं पण आठवण कधीच सुटत नाही !
जीवनात आई नावाचं पान कधीच मिटत नाही !!

# राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी राज्यातील गुणवंत कामगारांना न्याय द्यावा-गुणवंत एच.मिसलवाड

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------


कामगार मंत्री


कामगार राज्यमंत्री

राज्य सरकारच्या इतर विभागाच्या पुरस्कारर्थींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस मधून प्रवासात सवलत दिली जाते. मात्र महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कल्याण पुरस्कार प्राप्त पुरस्कारर्थींना आज अखेर कोणताही लाभ दिला जात नाही. ही बाब संबंधीत पुरस्कारर्थींवरती अन्यायकारक आहे, त्यामुळे राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर व कामगार राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी गुणवंत कामगारांना न्याय दिला पाहिजे, अशी आग्रही मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे विभागीय वंचित-उपेक्षीत घटकासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या नोंदीत कामगारांना विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार देवून गौरविण्यात येते. हा कार्यक्रम राज्याचे महामहीम राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.कामगार मंत्री, मा.कामगार राज्यमंत्री, केंद्रीय मंत्री, आमदार, खासदार, संचालक मंडळ तसेच प्रमुख प्रशासकीय आदी मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न आदींना एसटी महामंडळाच्या बसमधून प्रवासात सवलत दिली जाते. मात्र महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कल्याण पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थींना आज अखेर कोणताही लाभ दिला जात नाही. विशेष म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील ११ फेब्रुवारी २०२५ च्या मंत्रालयीन भेटीत या बाबतीत लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन देखील त्यांनी दिले होते. त्यामुळे कामगार मंत्री आकाश फुंडकर व राज्यमंत्री आशिश जैस्वाल यांनी राज्यातील गुणवंत कामगारांना एसटी महामंडळाच्या माध्यमातून प्रवास सवलतीचा लाभ देवून कष्टकरी कामगार-कार्यकर्त्यास प्रोत्साहन व पाठबळ द्यावे, अशी मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे विभागीय संचालक गुणवंत एच.मिसलवाड, नांदेड जिल्हाध्यक्ष रत्नाकर शिंदे पाटील, कार्याध्यक्ष कॉ.पंडित तेलंग, जिल्हा सचिव विजय रणखांब, उपाध्यक्ष रामदास पेंडकर, कोषाध्यक्ष राम ठाकूर यांनी राज्य शासनाकडे केली असल्याची माहिती प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये केली आहे.

# सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात 'अविष्कार' संशोधन उन्हाळी कार्यशाळेचे आयोजन


संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभाग व सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ११ मे २०२५ रोजी २० व्या अविष्कार -रिसर्च कन्व्हेंशन या संशोधन स्पर्धेच्या तयारीसाठी पालघर झोन-६ च्या उन्हाळी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थी तसेच शिक्षकांमध्ये संशोधनाविषयी गोडी निर्माण व्हावी या हेतूने अविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन केले जाते. कला, वाणिज्य, व्यवस्थापनशास्त्र, विधी, विज्ञान, अभियांत्रिकी, कृषी या विविध विषयांमध्ये विद्यार्थ्यांना आपले संशोधन प्रकल्प सादर करता येतात. सदर कार्यशाळेसाठी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील अविष्कार संशोधन स्पर्धेच्या विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मीनाक्षी गुरव तसेच विशेष तज्ञ मंडळी विद्यार्थी संशोधकांना व शिक्षकांना मार्गदर्शन करणार आहेत. तरी या कार्यशाळेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थी आणि शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहन सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे यांनी केले आहे.

# यंदाच्या पावसाळ्यात शेणपुर-मलांजनमधील संपर्क तुटणार?

## दोन्ही गावांना जोडणाऱ्या पुलाची दुरावस्था उघड्या लोखंडी गजांमुळे वाहनांना धोका

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------------



साक्री तालुक्यातील शेणपूर व मलांजन या गावांना जोडणाऱ्या पांझरा नदीवरील फरशी पुलावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. पुलाच्या कामात वापरलेले लोखंडी गज उघडे पडले असून ये-जा करणाऱ्या वाहनांना धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यापूर्वी पुलाच्या देखभाल दुरुस्तीचे काम झाले नाही तर पांझरा नदीला येणाऱ्या पुरामुळे पूल वाहतुकीसाठी उपलब्ध राहणार नसल्याची चिन्हे दिसत आहेत. यामुळे दोन्ही गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता आहे. चिकसे, गव्हाणीपाडा, देगाव, उंभरे शेवडीपाडा व नदीकाठी असलेले मलांजन या गावातील नागरिकांना व शेतकऱ्यांना साक्री जाण्यासाठी शेणपुर व मलांजन दरम्यान असलेल्या पांझरा नदीवरील पुलावरून जावे लागते. मात्र मागील चार ते पाच वर्षांपासून या पुलाची दूरदर्शा झाली असून यंदा त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पुलावर खड्डे पडले आहेत. वेगाने वाहणाऱ्या पुराच्या पाण्यामुळे पुलावरील कठडे वाकले आहेत. पुलाच्या कामावरील कॉँक्रीटचा वरचा थर निघाल्यामुळे लोखंडी गज वर आले आहेत. त्यातील काही गज तर सरळ खिळयासारखे उभे ठाकले असून पुलावरून जा-ये करणाऱ्या ट्रॅक्टर, ट्रक, बस, चार चाकी वाहने व दुचाकी चाकांमध्ये घुसून वाहने नादुरुस्त होत आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी व पांझरा नदीला पूर येऊन पुलावरून पुराचे पाणी जाण्याआधी या पुलाची गुणवत्तापूर्ण दुरुस्ती होणे आवश्यक आहे. जर पुलाच्या दुरुस्तीचे काम महिना-दीड महिन्यात पूर्ण झाले नाही तर दोन्ही गावांमधील संपर्क तुटण्याची भीती निर्माण झाली आहे. या पुलावरून शेतमाल वाहतूक करणारी अवजड वाहने पार होताना खड्ड्यांमुळे व उघड्या गजांमुळे अपघात झाला तर वाहन चालकांना धोका उद्भवू शकतो व वाहनांमधील शेतमालाचेही नुकसान होऊ शकते. शेणपुर व मलांजन ही दोन्ही गावे नदीपात्रापासून खूप उंचावर आहेत. मात्र नदीवरील फरशी पूल आठ ते दहा फूट एवढाच उंच आहे. पुलावरून गावाकडे जाणारे दोन्ही रस्ते चढाईचे आहेत. या चढतीवर दोन्ही बाजूंचे रस्ते अत्यंत खराब अवस्थेत गेले आहेत. अवजड वाहनांना पुलावरून चढतीच्या रस्त्यावर चढताना मोठी कसरत करावी लागते. काही वेळेला वजन जास्त असेल तर वाहने खड्ड्यांमुळे मध्येच थांबून राहतात. पांझरा नदी पार करण्यासाठी या दोन्ही बाजूच्या गावांना केवळ हा पूलच एक साधन आहे. परंतु त्या पुलाची मागच्या चार ते पाच वर्षांपासून अत्यंत अवस्था झाली आहे. पिंपळनेर-चिकसे-देगाव-मलांजन-शेणपुर अशी मध्य भागातील गावे, साक्री-पिंपळनेर या मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्याने बस वाहतूक, शेतकऱ्यांचे ट्रॅक्टर व ट्रॉली तसेच इतर मालवाहतूक वाहने, ट्रक यासारखी मोठी अवजड वाहने व दुचाकी वाहनांचा वापर आहे. प्रत्येक पावसाळ्यात पांझरा नदीला आलेल्या पुरामुळे या फरशी पुलावरील लोखंडी संरक्षक कठडे सुद्धा वाकून गेले आहेत. त्यामुळे पुलावरून एखादे अनियंत्रित वाहन नदीमध्ये कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा अत्यंत दुःस्थितीतील पुलाची उंची वाढवावी, पुलाच्या डागडुजीचे काम त्वरित करावे व काम चांगल्या दर्जाचे व्हावे, अशी मागणी शेणपुर मलांजन गावाच्या ग्रामस्थांनी केली आहे.

# राष्ट्रवादी शरद पवार तालुकाध्यक्ष गिरीश नेरकर यांची प्रशासनाकडे पत्राद्वारे मागणी; साक्री तालुक्यात 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना रखडली

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------





साक्री तालुक्यातील 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना प्रशासनाच्या उदासीनतेमुळे रखडली आहे. गेल्या दीड ते दोन वर्षांपासून अर्ज करून आणि डिमांड नोट भरूनही शेतकऱ्यांना सौर कृषी पंप मिळालेले नाहीत. या योजनेच्या अंमलबजावणीतील दिरंगाईमुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे तालुका अध्यक्ष गिरीश नेरकर यांनी यासंदर्भात प्रशासनाला पत्र पाठवून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना साक्री तालुक्यात केवळ कागदावरच राहिली आहे. अनेक शेतकऱ्यांनी दीड वर्षापूर्वी मंजुरी मिळून डिमांड नोट भरली असूनही त्यांच्या विहिरींवर अद्याप सौर कृषी पंप बसविण्यात आलेले नाहीत. शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. तालुक्यात भारनियमनामुळे आणि वारंवार खंडित होणाऱ्या अनियमित वीज पुरवठ्यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. जीर्ण झालेले तार व वाकलेले पोल यामुळे शेतीच्या कामात अडथळे येतात आणि शॉर्टसर्किट होऊन वीज पुरवठा खंडित होतो, ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. राष्ट्रवादी शरद पवार तालुकाध्यक्ष गिरीश नेरकर यांनी, किमान ज्या शेतकऱ्यांची मागणी मंजूर झाली आहे आणि ज्यांनी डिमांड नोट भरली आहे, त्यांना तरी त्वरित सौर कृषी पंप योजनेचा लाभमिळावा, अशी मागणी केली आहे. 'मागेल त्याला सौर कृषी पंप' ही केवळ घोषणा न राहता ती त्वरित कार्यान्वित होण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेला आदेश द्यावेत, अशी विनंती त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक आणि मानसिक नुकसान सौर ऊर्जा कंपन्यांवर प्रशासनाचे नियंत्रण नसल्यामुळे त्यांचे कर्मचारी शेतकऱ्यांना योग्य प्रतिसाद देत नाहीत. कर्ज काढून डिमांड नोट भरलेल्या शेतकऱ्यांना वेळेवर कनेक्शन न मिळाल्याने त्यांचे आर्थिक व मानसिक नुकसान होत आहे. पुढील हंगामासाठी लाभ मिळावा पुढील हंगामासाठी तरी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा आहे. 'मागेल त्याला सौर कृषी पंप या ब्रीदवाक्याचा आदर करून साक्री तालुक्यातील शेतकऱ्यांना त्वरित सौर कृषी पंप बसवण्यासाठी योग्य ते आदेश द्यावेत, अशी मागणी गिरीश नेरकर यांनी प्रशासनाला पाठवलेल्या पत्रात केली आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

PASSWORD PROTECTED PAGE